# ॥ बाबा ॥
## विडा

कोवळे नागवेली हे पान छान
विडा करून ठेविला सान

मन विचारास देऊ चालना
मऊ मुलायम लाविला चुना
अहंकार फोडूनी या
शांती सुपारी कातरली
श्रद्धा कात हा रंगविला ॥ धृ ॥

अंधश्रद्धा तंबाखूला मळून
देहबुद्धी चोळून मावा बनविला
सात्विक सुवासी वेलदोडे
ज्ञानरूपी लवंगा आणिल्या
विडा करून ठेविला साना ।

★★★★★